Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue – III October 2014

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचा शेतीबद्दलचा दृष्टीकोन

**श्री. अनिरूद्ध सर्जेराव उढाण,**
**संशोधक,**
**उढाण निवास, लक्ष्मीनारायणपुरा, मस्तगड, जालना.**

भारतामध्ये सुरूवातीपासून शेतकऱ्यांची परिस्थिती फारशी समाधानकारक दिसून येत नाही. कारण शेती ही निसर्गावर अवलंबून असल्यामुळे निसर्गानुकूल असेल तर शेतीचा विकास होतो. परंतु निसर्ग जर अनुकूल नसेल तर शेतकऱ्यांची परिस्थिती अतिशय हालाखीची असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकऱ्यांबद्दलदेखील महत्वाची भूमिका बनविली आहे. विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे आंबेडकरांचे अर्थशास्त्रीय लेखन प्रामुख्याने स्वातंत्र्यपुर्व कालदर्शिपणा व त्यांच्या विचारातील सखोलपणा यामुळे त्यांचे लेखन देशाच्या काही आर्थिक समस्यांवर अगदी आजही सर्वार्थाने लागू पडतात. प्रस्तुत शोध निबंधात डॉ. आंबेडकरांचे शेतकऱ्यांबद्दल असणारा दृष्टिकोन मांडण्याचा प्रयत्न केला आहे. भारतातील धारणाक्षेत्र सरासरी लहान आकारमान त्यामुळे निर्माण झालेले प्रश्न व उपाययोजना सुचविलेल्या आहे. त्यांच्या मते लहान धारणाक्षेत्र हे भारतीय शेतीला भेडसावणारी एक गंभीर समस्या आहे.(१) परंतु ही लहान धारणाक्षेत्र विखुरलेली असल्याने समस्या अधिक बिकट होते. उदाहरणार्थ मुंबई भागात सरासरी धारणा क्षेत्र २५–९ एकर आहे. ही धारणाक्षेत्रे लहान लहान तुकड्यात विभागली गेली आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील अवघ्या २० गुंठ्याचे धारणाक्षेत्र तीन तुकड्यात विभागले गेले आहे तर ठाणे जिल्ह्यातील १ एकर ९ गुंठ्यात धारणाक्षेत्र विभागले गेले आहेत. अशा प्रकारे शेती हा सर्वात मोठा राष्ट्रीय व्यवसाय असल्यामुळे एकीकडे त्याच्यावर सर्वात जास्त लोक अवलंबून आहे तर दुसरीकडे शेतीची उत्पादकता कमी आहे. (२) धारणाक्षेत्राचा आकार वाढीचे व तुकडे जोड करणे या गोष्टींना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विरोध होता. शेती हा उत्पादकाचा उपक्रम असल्यामुळे मोठी व लहान क्षेत्रे अशी गोष्ट असू शकत नाही. अशा तऱ्हेने आंबेडकरांच्या मते भारतातील शेतीमधून अतिरिक्त उत्पादन न झाल्यामुळे भांडवलाचा तुटवडा निर्माण होतो. ही शेतीची खरी समस्या आहे. (३) भारतातील शेतीची समस्या सोडविण्याचा एक मार्ग म्हणून आंबेडकरांनी सरकारी शेतीचा पुरस्कार केला होता. (४) खोती पद्धत ठाणे, रत्नागिरी, कुलाबा या जिल्ह्यात प्रचलित होती. त्या पद्धतीचा अंत करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले होते. खोती पद्धतीमध्ये भूधारकांकडून शेतसारा गोळा करून त्यांचा काही हिस्सा शासनाच्या तिजोरीत भरण्याची जबाबदारी खोत या व्यक्तीकडे असे. खोती अंताचे विधेयक

सादर करून भूधारकांच्या शोषणाला मूठमाती देण्याचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रयत्न होता. (५)

भारताच्या शेतीसमस्येवरील उपायासंबंधी आंबेडकरांची भूमिका ही सतत विकसित होत गेली. शेतीसमस्येबाबतचा त्यांचा सुरूवातीचा दृष्टीकोण हा फार मोठ्या प्रमाणावर अर्थशास्त्रज्ञाच्या भूमिकेतून होता. त्यामुळे त्यांच्या प्रतिपादनाचा भर हा प्रामुख्याने शेतीक्षेत्रात असलेले अतिरिक्त मनुष्यबळ, त्यामुळे त्यांच्या प्रतिपादनाचा भर हा प्रामुख्याने शेतीक्षेत्रात असलेले अतिरिक्त मनुष्यबळ, त्यामुळे निर्माण होणारा वाजवीपेक्षा अधिक रोजगार, भांडवल, यंत्रसामुग्रीचा तुटवडा, त्याचा परिणाम म्हणून शेतीक्षेत्रातील कमी उत्पादकता व 'वाढावा' निर्माण होण्याचा अतिमंद वेग आणि त्यामुळे आर्थिक प्रगती साध्य करण्याची प्रक्रिया गतिमान करण्यामध्ये निर्माण होणाऱ्या अडचणी या गोष्टींवर होता. या संदर्भात त्यांनी उद्योगीकरण वेगाने घडवून आणून शेतीक्षेत्रातील अतिरिक्त मनुष्यबळ औद्योगिक क्षेत्रात सामावून घेण्याचा तोडगा सुचविला.(६)

आंबेडकरांनी केलेल्या औद्योगिकरणाच्या प्रतिपादनाला दुसरी एक महत्वाची बाजू होती, ती म्हणजे जातिव्यवस्था-अस्पृश्यता ही होय. शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात जातिव्यवस्था व अस्पृश्यतेची मुळे अधिक खोलावर रूजली होती. त्यामुळे उत्पन्नाच्या साधनांची मालकी नसलेला अस्पृश्य समाज हा जसा आर्थिकदृष्ट्या परावलंबी तसाच सामाजिकदृष्ट्या बहिष्कृत व हिणकस जगत होता. उद्योगिकीकरण वेगाने झाल्यास उपजीविकेचे पर्यायी साधन उपलब्ध होऊन अस्पृश्य समाजाला शहरात जाण्याची संधी प्राप्त होईल. असे झाल्यास खेड्यातील अस्पृश्यतेच्या दाहक चटक्यापासून अस्पृश्यांची काही प्रमाणात सुटका होईल. ''शेतीसमस्येवर उद्योगिकीकरण हाच खात्रीलायक उपाय आहे.'' असे प्रतिपादन करतांना आंबेडकरांच्या मनात कुठेतरी हा विचार असणे स्वाभाविक वाटते. अर्थात उद्योगिकीकरण हा खात्रीलायक उपाय असला तरी त्वरित घडून येण्याची शक्यता नसल्यामुळे शेती समस्येवर उपाय म्हणून आंबेडकरांनी सहकारी शेतीचा मार्ग सुचविला होता. त्यांच्या मते 'विखुरलेल्या व लहान' धारणक्षेत्राची समस्या सहकारी शेतीमुळे सोडविता येईल.(७)

पुढे मात्र प्रस्तुत प्रश्नासंबंधी आंबेडकरांचा दृष्टिकोण अधिक व्यापक झाल्याचे दिसते. कोणत्याही प्रश्नाची चिकित्सा करतांना एका विशिष्ट व व्यापक अशा आर्थिक, सामाजिक व राजकिय दृष्टिकोणातून पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोणाशी ही गोष्ट अगदी सुसंगत होती. शोषित-उपेक्षित जनतेला न्याय मिळाला पाहिजे, ही भूमिकाच त्यांच्या समग्र जीवनाचे तत्वज्ञान होते. शेतात घाम गाळणाऱ्या कुळांच्या शोषणावर आधारलेली व फक्त जमीनदारांना (खोतांना) उपकारक ठरलेली खोती पद्धती नष्ट करण्याचे त्यांनी प्रतिपादन केले, ते याच भूमिकेतून. (८)

मात्र 'शासकिय समाजवादा' चा आंबेडकरांनी केलेला पुरस्कार हा त्यांच्या स्वतंत्र भारताच्या एकूणच सामाजिक व आर्थिक पुनर्रचनेबाबतच्या भूमिकेचा अंतिम व शेवटचा टप्पा होय. त्यांच्या मते आर्थिक समता प्रस्थापित झाली; तरच राजकिय स्वातंत्र्याला अर्थ प्राप्त होईल.(९) त्यामुळे आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी समाजाच्या आर्थिक व्यवहारात शासनाने हस्तक्षेप करणे अपरिहार्य होते. या भूमिकेतून त्यांनी शासकिय समाजवादाचा एक भाग म्हणून 'सामुदायिक शेती' चे प्रतिपादन केले; कारण तसे झाल्यासच जमीनदार, कूळ व शेतमजूर हा भेद नष्ट होणार होता.(१०) उद्योगिकीकरण व सहकारी शेती याहीपेक्षा 'सामुदायिक शेती' हा दलित-अस्पृश्याला न्याय देण्याचा अधिक व्यापक व परिणामकारक उपाय होता. याबद्दल आंबेडकरांच्या मनात शंका नव्हती. तसेच हुकूमशाहीला दूर ठेऊन सांसदीय लोकशाहीच्या चौकटीत शासकिय समाजवाद कायम स्वरूपात टिकविण्यासाठी आंबेडकरांनी शासकिय समाजवादाची तरतूद राज्यघटनेत करण्याची शिफारस केली.(११)

शासकिय समाजवादाचा आंबेडकरांनी केलेला पुरस्कार व तो कार्यान्वित करण्यासाठी सुचविलेला मार्ग म्हणजे स्वातंत्र्य आणि समता यावर आधारलेल्या लोकशाहीवरील त्यांच्या अनन्यसाधारण निष्ठेचा आविष्कार होय.(१२)

थोडक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मनामध्ये शेतकऱ्यांबद्दलदेखील आस्था होती असे वरील लेखाद्वारे दिसून येते. (१३)

भारतामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विविध पद्धतीने शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेण्याचा प्रयत्न करून सोडवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विविध लेख – पृष्ठ क्र. २६
२) कित्ता – पृष्ठ क्र. २७
३) कित्ता – पृष्ठ क्र. २८
४) कित्ता – पृष्ठ क्र. २९
५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ – पृष्ठ क्र. ३८४
६) कित्ता – पृष्ठ क्र. ३८५
७) कित्ता – पृष्ठ क्र. ३८६
८) गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, एज्युकेशन – पृ. क्र. २३

डिपार्टमेंट खंड १

९) किता – पृष्ठ क्र. २४

१०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर – ए सोशल रिव्होल्युशनरी, नवी दिल्ली १९८५ पृष्ठ क्र. १६

११) डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ – पृष्ठ क्र. ३८८

१२) किता – पृष्ठ क्र. ३८९

१३) किता – पृष्ठ क्र. ३९०